Open Access
उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका
(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)
Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India
Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/
ISSN (Online): 2583-8423
Volume 1, Issue 4, October 2023; Pages 680 – 683
DOI: 10.5281/zenodo.10279190

**Original Research Article**

# ग्रामोद्योग (Village Industry)

प्रा. डॉ. सतीशकुमार बाबुराव डोंगे

कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, गंगाखेड ४३१५१४ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: sbdonge@gmail.com

Received: 14 October, 2023 | Accepted: 26 October, 2023 | Published: 28 October, 2023

ग्रामोद्योग म्हणजे गावात निर्माण होणारे व चालणारे उद्योग. गांधीजींनी अनेकदा हे सांगितलेले आहे की खरा भारत हा खेडयात वसलेला आहे. खेडयात आजही मोठया प्रमाणात सार्वजनिक व वैयक्तिक स्वच्छतेचा अभाव जाणवतो तसेच सकस आहाराची कमतरता व अज्ञान है रोग ठाण मांडून बसले आहेत. वैज्ञानिक दृष्टीकोनाचा अभाव खेडयातील लोकांमध्ये दिसून येतो. त्यामुळे खेडयाचे शहरीकरण करण्यापेक्षा खेडी स्वयंपूर्ण करणे गरजेचे आहे. त्यासाठी स्थानिक कच्चा माल, स्थानिक कामगार, स्थानिक यंत्रे व स्थानिक गरजा यांची योग्य सांगड घालणे आवश्यक आहे. बेरोजगारी कमी करून युवकांच्या हाताला काम उपलब्ध करून देण्याचे महत्वाचे कार्य ग्रामोद्दोग करू शकतात असे गांधीजींचे म्हणणे होते.

औद्योगिक क्रांतीच्या काळात ग्रामोद्दोग म्हणजे मागासलेपणा असा विपर्यस्त अर्थ कित्येक वेळा काढण्यात येतो. पण माणसाच्या जीवनात कितीही सुख-सोयी निर्माण झाल्या तरी त्याचा हातपाय आदी अवयवांच्या हालचालीवर नियंत्रण घालून त्याचे संपूर्ण जीवन यंत्रावर अवलंबून करून टाकले, तर त्याचे मानवदेही जीवनच हळूहळू नष्ट होऊन जाईल. म्हणून ग्रामोद्दगाला एक वेगळे महत्व प्राप्त होते. भारतातील बहुसंख्य ग्रामीण लोकांचा मुख्य धंदा शेती हा आहे. शेतीला पूरक म्हणून गांधीजींनी ग्रामोद्योगावर भर दिला.

### महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ

महाराष्ट्रातील खादी व ग्रामोद्योगाच्या विकास कार्यासाठी महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाची सन १९६२ मध्ये स्थापना केली आहे. ग्रामीण क्षेत्रातील गरजू युवकांना रोजगार, खेड्यापाड्यातील कारागीर व बलुतेदार यांच्या उद्योगाचे स्थैर्य, स्वयंरोजगाराच्या क्षेत्राची व्यापक प्रमाणात वृध्दी, खादी व ग्रामोद्योगासाठी पतपुरवठा, कच्चा माल पुरवठ्याची शिफारस, कारागिरांचे तांत्रिक कौशल्य वाढविण्यास उत्तेजन, तयार मालाच्या विक्रीस मदत, निवडक ग्रामोद्योगांचे प्रशिक्षण, खादी ग्रामोद्योगाच्या विकासास पोषक असे धोरण ठरविण्याबाबत शासनाशी प्रभावी संपर्क,

स्थानिक साधन संपत्तीचा वापर करुन ग्रामीण भागातील कारागिरांना रोजगार मिळवून देणे हे या मंडळाचे उद्दिष्ट आहे. सूक्ष्म, लघु व मध्यम उद्यम मंत्रालय, भारत सरकारतर्फे सूक्ष्म उद्योग उभारण्यासाठी पहिल्या पिढीच्या उद्योजकांना सक्षम बनविणारी प्रधानमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम ही योजना आहे. जिल्हा उद्योग केंद्राकडे कार्यान्वित असलेली प्रधानमंत्री रोजगार योजना व खादी आयोगाची आर.ई.जी.पी. मार्जिन मनी योजना या दोन्ही योजना एकत्रित करून ही नवीन योजना कार्यान्वित करण्यात आली आहे. वयाची १८ वर्ष पूर्ण झालेली व्यक्ती, किमान सातवी पास व्यक्ती रुपये ५ लाखांच्या वरील प्रकरणासाठी पात्र स्वयंसहाय्यता बचत गट पात्र, १८६० च्या सोसायटी नोंदणी कायद्यान्वये रजिस्टर्ड झालेल्या संस्था, १९६० च्या सहकारी कायद्यान्वये नोंदणी झालेल्या सहकारी सोसायट्या, एक कुटुंबांतील पती किंवा पत्नी एकच व्यक्ती लाभधारक होऊ शकते. योजनेअंतर्गत अर्थसहाय्य प्रकल्प मर्यादा ही उत्पादन युनिट / उद्योग रुपये २५ लाखांपर्यंत सेवा उद्योग रुपये १० लाखापर्यंत आहे.

१) मधमाशापालन

अनादी काळापासून मधाचा अन्न व औषध म्हणून उपयोग होत आला आहे. पोळे जाळून, पिळून मध गोळा करण्याच्या परंपरागत पद्धतीमुळे मधमाशांचा व पोळयाचा नाश होत होता तसेच मध खराब प्रतीचा व लवकर खराब होणारा होता. सन १९४६ साली महाबळेश्वर येथील मध माशापालन केंद्रामध्ये आधुनिक संशोधन केल्यामुळे मधमाशा व पोळयांचा नाश होत नाही. पोळे पुन्हा वापरता येते व उच्च प्रतीचा शुद्ध अहिंसक मध मिळतो. मध उद्योगापासून मिळणारे उत्पादन व उपयोग मध, मेण, पराग, रॉयल जेली आदी. मध शरीराला अत्यंत उपयुक्त घटक असून तो रक्तामध्ये त्वरित मिसळतो, त्यामुळे कार्यशक्ती वाढते. मधात अनेक प्रकारची जीवनसत्त्वे असून आयुर्वेदामध्ये अनेक प्रकारच्या औषधांमध्ये उपयोग केला जातो. मेणाचा उपयोग सौंदर्य प्रसाधने, औषधे, मेणबत्या यासाठी मोठ्या प्रमाणावर केला जातो.

मधमाशा व परागीभवन: मधमाशापालनामुळे शेती पिकांची, फळपिकांची, फुलशेतीची उत्पादनामध्ये परागीभवनामुळे उत्पन्नापेक्षा ४० टक्क्यापर्यंत वाढ होते, असे प्रयोगाअंती सिद्ध झाले. त्यामुळे वरील बाबींचा विचार करता मधमाशापालन शेतीला अत्यंत महत्त्वाचा पूरक उद्योग बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करून देणारा उद्योग आहे.

२) खनिज संपत्तीवर आधारित उद्योग

ग्रामीण कुंभार उद्योग, चुना उद्योग, नक्षीकाम करणे, दगडापासून बनविलेल्या उपयुक्त वस्तू प्लास्टर ऑफ पॅरिस तयार करणे, भांडी साफ करण्याची पावडर, सरपणापासून कोळसा तयार करणे, सोने, चांदी, खडे, शिंपले व कृत्रिम धातूपासून दागिने तयार करणे, रांगोळी तयार करणे, लाखेच्या बांगड्या बनविणे, रंग, वार्निश, डिस्टेंपर बनविणे, काचेची खेळणी उत्पादन, सजावटीसाठी काच कापणे, डिझायनिंग, पॉलिश करणे, रत्ने कापणे इ.

३) वन संपत्तीवर आधारित उद्योग

हातकागद उद्योग आगपेटी उद्योग अगरबत्ती उद्योग, गोंद (डिंक) उद्योग बांबू उद्योग काथ उद्योग पेपर कप्स प्लेट्स व कागदाची, वह्या तयार करणे, वाळयाचे पडदे व केरसुणी तयार करणे, वन उत्पादने संकलन व प्रक्रिया व पॅकिंग उद्योग, फोटो उद्योग लाख तयार करणे.

४) शेतमालावर आधारित उद्योग

धान्यडाळी प्रक्रिया, पापड उद्योग ग्रामीण तेल उद्योग गूळ उद्योग, मधूमक्षिकापालन उद्योग, औषधी वनस्पती, फळभाजी प्रक्रिया व परीक्षण उद्योग, तरटी, चटया आणि हार तयार करणे, काजू प्रक्रिया, द्रोण उद्योग व पत्रावळी तयार करणे, मका प्रक्रिया, शेवया उत्पादन, विदयुतचलित पीठ गिरणी, डाळी तयार करणे, तांदळाची साले काढणे, भारतीय मिष्टान्न उत्पादन, मेन्थॉल तेल, दुग्धजन्य उत्पादने तयार करणे, पशुचारा, कुक्कुटखाद्य उत्पादन, रसवंती, खाद्यपदार्थ स्टॉल युनिट.

५) पॉलिमर व रसायनांवर आधारित उद्योग

ग्रामीण चार्मोद्योग, अखादय तेल व आंघोळीचा साबण, रबराच्या वस्तू तयार करणे, रेक्झिनपासून वस्तू, पी.व्ही.सी. इ. वस्तू, शिंग व हाडे यांच्या हस्तिदंती वस्तू, मेणबत्ती कापूर व लाख तयार करणे, प्लास्टिकची पार्सल तयार करणे, टिकल्या, बिंदी बनविणे, मेहंदी तयार करणे, सुगंधी तेल तयार करणे, शाम्पू तयार करणे, केशतेल निर्मिती, धुण्याचे साबण व पावडर तयार करणे, फिनाईल उत्पादने, लिक्विड हॅन्डवॉश, सॅनेटरी क्लीनर सुतारकाम, लोहारकाम, अॅल्युमिनियम उद्योग, गोबर गॅस प्लॉट योजना, पेपर पिन्स, क्लिप्स, सेफ्टी पिन्स, स्टोव्ह पिन्स आदी तयार करणे, शोभेचे बल्ब, बाटल्या तयार करणे, छत्री जोडणी करणे, सौर व वायू ऊर्जेवर चालणारी उपकरणे तयार करणे, पितळ, तांबे आणि काश्याच्या वस्तू तयार करणे, रेडियो काम, स्टॅबिलायझरचे उत्पादन, इलेक्ट्रॉनिक्स घड्याळांचे उत्पादन, लाकडावर कोरीवकाम व फर्निचर तयार करणे, कल्हई करणे, मोटार वायंडिंग, तारेच्या जाळया, लोखंडी ग्रिल्स बनविणे, हातगाड्या, छोट्या सायकल रिक्षा आदी बनविणे, संगीत वाद्य तयार करणे इ.

६) वस्त्र उद्योग

खादी (सुती, रेशीम, लोकर), पॉलीवस्त्र (खादीव्यतिरिक्त), लोकवस्त्र, होजिअरी, शिवणकाम आणि तयार करणे, बाटिक वर्क, खेळणी व बाहुल्या बनविणे, सुताच्या व लोकरीच्या गुंड्या, लाची तयार करणे, भरतकाम, कापडावरील भरतकाम (पंचवर्क), वैद्यकीय पट्ट्या बनविणे, स्टोव्हच्या वाती बनविणे.

७) सेवा उद्योग

कपडे धुलाई, केस कापणे, नळकाम, विद्युत व इलेक्ट्रॉनिक्स उपकरणाची दुरुस्ती, डिझेल इंजिन्स व पंपसेटची दुरुस्ती, टायर दुरुस्ती, कीटकनाशक, लाऊडस्पीकर ध्वनिवर्धक यंत्रे भाड्याने देणे, बॅटरी चार्जिंग, कलात्मक फलक रंगविणे, सायकल दुरुस्ती दुकान, गवंडी काम, जेवणाचे हॉटेल, चहा स्टॉल, आयोडीनयुक्त मीठ, बँड पथक, ग्रामोद्योग सेल डेपो, खादी ग्रामोद्योग आयोगाच्या यादीतील कोणतेही उत्पादन/सेवा उद्योगातून ग्रामीण भागातील उद्योजक सुशिक्षित बेरोजगार कारागीर यांना स्थानिक ठिकाणी रोजगार उपलब्ध करून देणे हा मंडळाचा उद्देश आहे.

## समारोप

उद्योग जोपर्यंत गावात चालणार नाहीत तोपर्यंत गावे स्वावलंबी होणार नाहीत. तसेच गावात निर्माण होणाऱ्या वस्तूच खरेदी करण्याविषयी प्रत्येकाने आग्रही असले पाहिजे. प्रत्येक गावाची पाहणी करून तेथे कोणत्या वस्तू निर्माण करता येऊ शकतात याची योजना सरकारने आखली पाहिजे. अशाने रोजगार निर्मिती होऊन सुशिक्षित बेकारीत घट होईल.

## संदर्भ सूची

१. कृषि व ग्रामीण. अर्थशास्त्र. (२०१२) कविमंडल विजय, श्री मंगेश प्रकाशन नागपूर.

२. आर्थिक विचारांचा इतिहास - प्रा. डी. बी. बी. इंगळे, अरुणा प्रकाशन, लातूर.

३. ग्रामीण विकासाचा एकात्मिक दृष्टिकोन- (२००६) कराळे, कविमंडल. श्री मंगेश प्रकाशन, नागपुर.

४. सर्वोदय - मो.क.गांधी अनुवाद- ब्रिजमोहन हेका, प्रकाशन नवजीवन प्रकाशनमंदीर, अहमदाबाद.